# पंचायत समिती कोरेगांव महिला व बाल विकास विभाग
# दुरध्वनी क्रमांक ०२१६३-२२०२६२.

जा.क्रं.पंसको/मबाक/अभ्यासदौरा/२०२०/२६५८
पंचायत समिती कोरेगांव
दिनांक :- १५/०२/२०२०

प्रति,

१.
२.
३.
४.

**विषय-** पंचायत समिती महिला सदस्यांचा अभ्यासदौरा आयोजनासाठी दरपत्रके सादर करणेबाबत

पंचायत समिती कोरेगांव मधील महिला सदस्यांचा राज्याबाहेरील अभ्यास दौरा केरळ येथे आयोजित करणेसाठी दरपत्रके मागविणेत येत आहेत.आपण आपले दरपत्रके या कार्यालयाकडे दि. २५/०२/२०२० रोजी सायं.५.०० वाजेपर्यत समक्ष लिफाफाबंद सादर करावेत.

पंचायत समिती कोरेगांव महिला सदस्यांचा अभ्यासदौरा केरळ येथे आयोजित करणेसाठी रेल्वे प्रवास वातानुकुलीत थ्री टायर्स बुकींग, रेल्वे स्थानकापासून ते केरळ राज्यातील सर्व भेटी देण्याची ठिकाणां पर्यंत २४२ ची एसी लक्झरी बस सेवा, प्रवासा दरम्यान नाष्टा, सकाळचे जेवण, संध्याकाळचे जेवण व दुपारी चहा/नाष्टा, स्वच्छ पिण्याचे पाणी पुरविणे, सर्व प्रवेश कर,टोल,व्हॅट इत्यादी सह दर नमुद करावेत.मराठी,हिंदी,इंग्रजी भाषेचे ज्ञान असणारा गाईड असणे आवश्यक आहे. दोन प्रवाशांना एक डिलक्स रुम देणे बंधनकारक आहे.तेथे स्वच्छता व लोकेशन चांगले असावे. सर्व कर,जेवण,फिरणे,नाष्टा,वाहतुक,रहाणे यासह **दर एकत्रित एका व्यक्तीचे प्रवासासाठी नमुद करावेत.**त्यामध्ये अतिरिक्त करांचा /सेवांचा समावेश नसावा. कोणत्याही प्रवाशाला संपुर्ण प्रवासात कोणताही अतिरिक्त खर्च करता येणार नाही.अथवा घेता येणार नाही.तसेच वाहनांच्या सुविधा मध्ये वाहनांचे टुरीस्ट चे परवाना असणे आवश्यक आहे. या सर्व बाबींसहीत मान्यताप्राप्त पर्यटन कंपनीकडून दरपत्रके मागविणेत येत आहेत. सविस्तर तपशिल सोबत सादर केला आहे.

**दरपत्रकासोबत खालील प्रमाणे कागदपत्रे जोडण्यात यावीत.**

**१. पहिला लखोटा**

१.स्वतः कंपनीचे अधिकृत प्रायोजक/त्यांचे ट्रॅव्हल एजंट की जे व्यवसाय करणेस मान्यता असलेबाबतचे (कंपनीचे) प्रमाणपत्र अथवा सक्षम अधिकृत मान्यता प्राप्त संस्थेचे प्रमाण पत्र त्यांचेकडे असणे आवश्यक आहे त्याची फोटोप्रत सादर करावी.

२.पॅनकार्ड

३.सन २०१८-१९ या आर्थिक वर्षामधील अदयावत आयकर दाखला

४.जी.एस.टी.रजिस्ट्रेशन प्रत,

**२. दुसरा लखोटा**

**१. यामध्ये सर्व करासहीत प्रति व्यक्ती खर्चाचा दर नमुद करावा.**

**.दरपत्रके शक्य झालेस दि. २५/०२/२०२० रोजी अथवा तदनंतर कार्यालयीन कामकाजाचे दिवशी उघडणेत येतील.**

गटविकास अधिकारी (वर्ग-१)
पंचायत समिती कोरेगांव

# पंचायत समिती कोरेगांव

## दरपत्रकाद्वारे सेवा पुरविणे वर्णन दर्शविणारा तपशील.

| अ क्रं | योजनेचे नांव. | अंदाजे तरतुद रु लाखात | अंदाजे प्रवासातील व्यक्ती संख्या | तपशिल |
|---|---|---|---|---|
| १ | **पंचायत समिती महिला सदस्यांचा अभ्यास दौरा (केरळ राज्यातंर्गत)** | २.९५ | जास्तीत जास्त ७ सदस्य | १) रेल्वे प्रवास वातानुकुलित थ्री-टायर्स<br>२) रेल्वे स्थानकापर्यत तसेच केरळ राज्यातील पंचायत राज संस्था,विधानसभा,येथे जाणेसाठी तेथील नाविण्यपुर्ण योजना,महिला सक्षमीकरण यांचे अभ्यासास्तव आहे. २X२ A/C लक्झरी बस सेवा देणे बंधनकारक<br>प्रवासाचा तपशील खालीलप्रमाणे<br>१) मुन्नार ग्रामपंचायत ता.देवीकुलम जि. इडुकी<br>२) देवीकुलम गट पंचायत जि.इडुकी<br>३) अलपुझा नगरपरिषद जि.अलपुझा<br>४) कोलम कार्पोरेशन जि.कोलम<br>५) कोची सेक्रेटरी अनुजा ए.एस.कोची कार्पोरेशन जि.इरनाकुलम,<br>६) एलुर(इरनाकुलम) नगरपरिषद,<br>७) परतीचा प्रवास<br>८) दुपारचा चहा /नाष्टा यासह दर नमुद करावेत.<br>९) स्वच्छ पिणेचे पाणी प्रवासात पुरविणे.<br>१०) सर्व प्रवेश कर,टोल,व्हॅट इत्यादी सह दर नमुद करावेत.<br>११) मराठी,इंग्रजी,हिंदी तिन्ही विषयांचे सखोल ज्ञान व बोलता येणारा गाईड(मार्गदर्शक) प्रवासात सोबत असावा.<br>१२) प्रवासा दरम्यान महाराष्ट्रीयन तसेच आवश्यकतेप्रमाणे सदर केरळ राज्याचा फुडचा समावेश असावा.<br>१३) दोन प्रवाशांना एक डिलक्स / रुम देणे बंधनकारक आहे.तेथे स्वच्छता व लोकेशन चांगले असावे.<br>१४) अभ्यास दौरा कालावधी कमीतकमी ०७ व जास्तीत ०९ दिवस असावेत<br>१५) सर्व कर,जेवण,फिरणे,नाष्टा,वाहतुक,यासह दर एकत्रित एका व्यक्तीचे प्रवासासाठी नमुद करावेत.त्यामध्ये अतिरिक्त करांचा /सेवांचा समावेश नसावा.<br>१६) सदर अभ्यास दौ-यामध्ये जास्तीत जास्त ०६ ते ०७ सदस्य समाविष्ट असतील त्यामध्ये कमी जास्त होऊ शकेल.<br>१७) सदरचा अभ्यासदौरा मार्च २०२० मध्ये आयोजित करणेचा आहे.<br>१८) अभ्यासदौरा पूर्ण झाल्यावर देयक अदा करणेत येईल. |

गटविकास अधिकारी (वर्ग-१)
पंचायत समिती कोरेगांव